**जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,**
**ठाणे शहर**
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

**प्रेसनोट** **दिनांक २०.१२.२०२४**

## ‘‘सन २०१८ मध्ये झालेल्या खुनाच्या गुन्हयातील आरोपीस जन्मठेप’’

सन २०१८ मध्ये खुनाच्या गुन्हयातील महिला आरोपी जमनाबेन मंगलदास मंगे, वय ७१ वर्षे हिने तिची सुन सौ.दक्षता अशोक मंगे, वय ३० वर्षे हिस लग्न झाल्यापासुन शुल्लक कारणांवरून शारिरीक व मानसिक त्रास देवुन तिचे अंगावर रॉकेल ओतुन तिस पेटवुन देवुन जिवे ठार मारले होते. त्याबाबत सदर महिला आरोपीविरूध्द वागळे इस्टेट पोलीस ठाणे येथे गु.र.नं. I ७२/२०१८, भा.द.वि. कलम ३०२, ४९८(अ), ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाच्या तपासात तत्कालीन तपासी अधिकारी महिला पोलीस निरीक्षक/एस.व्ही.देशपांडे (गुन्हे) व त्यांचे तपास पथकाने भक्कम पुरावे गोळा करून आरोपी विरूध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले होते.

सदर गुन्हयाची सुनावणी मा.श्री.डी.एस.देशमुख साहेब, अति. सत्र न्यायाधिश, ठाणे यांनी घेवुन खुनाच्या गुन्हयातील महिला आरोपी जमनाबेन मंगलदास मंगे हिस भा.द.वि. कलम ३०२, ४९८(अ), ३४ प्रमाणे दोषी ठरवुन जन्मठेप व ५० हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे.

सदर खुनाच्या गुन्हयाच्या संदर्भात सरकारच्या वतीने सरकारी अभियोक्त्या मा.श्रीमती संध्या म्हात्रे, तत्कालीन तपासी अधिकारी महिला पोलीस निरीक्षक/एस.व्ही.देशपांडे (गुन्हे), वरिष्ठ पोलीस निरीक्षक/श्री.शिवाजी गवारे, पोहवा/सावळे, पोहवा/गावीत, पोलीस अंमलदार/अमोल सडेकर यांनी अथक परिश्रम करून मा.न्यायालयात ठोस पुरावे सादर केले व त्यामुळे उपरोक्त गुन्हयातील आरोपीला दोषी ठरविण्यात यश आल्यामुळे सदर उत्कृष्ठ कामगिरीबाबत पोलीस दलात व समाजातील सर्व स्तरातुन पोलीसांचे कौतुक होत आहे.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर